I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** पंढरपूर शहर **Year (वर्ष):** 2026
**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0385 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2026 20:30 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 01/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 01/06/2026
**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 10:56 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:41 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 01/06/2026 **Time (वेळ):** 21:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 052 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2026 22:04 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसील कार्यालय पंढरपूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 04/06/1982 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | अलीफ शमशुद्दिन सुतार | | | 1. Town/Village (शहर / गाव): दामाजी नगर,धर्मगाव रोड,मंगळव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | मारूती ज्ञानोबा वाघमारे | | | 1. Town/Village (शहर / गाव): येड्राव,ता मंगळवेढा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.01/06/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.29/05/2026 रोजी 12.30 वा चे सुमारास आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे, व्यवसाय - वकिली, रा. पंढरपूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. त्यानुसार 14.00 वा चे सुमारास 1) धम्मरत्न राजकुमार कांबळे, पद -कनिष्ठ श्रेणी लिपिक व 2) शाक्यपुत्र उपगुप्त चौधरी, पद - कनिष्ठ श्रेणी लिपिक हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हॉईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 14.30 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, पो.उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण आम्ही पंढरपूरच्या दिशेने रवाना झालो. यादरम्यान तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून आम्ही गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात 16.00 वा. जाऊन पोहोचलो. काहीवेळात तक्रारदार फावडे हे सुध्दा त्याठिकाणी पोहोचले. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून पो.उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंचांची, पथकातील अंमलदारांची व आमची स्वतःची ओळख करून दिलो. त्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव, पत्ता व त्यांच्या तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री.रोहित रामभाऊ फावडे, व्यवसाय - वकिली असे सांगुन ते दिवाणी, फौजदारी दाव्यांसह 01 वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये जन्म-मृत्यू दाखले न काढलेल्या प्रकरणात पक्षकारांच्यावतीने तहसीलदार यांच्या कोर्टात अर्ज दाखल करून जन्म-मृत्यू दाखला मिळण्याकरीता आवश्यक तहसीलदार यांचे आदेश प्राप्त करून देण्याचे काम करतात. त्यापैकी

रमेश बनकर, सागर कांबळे, विकास पवार व इतर काही प्रकरणे अंतिम आदेशावर असून त्यांच्या आदेशाबाबत विचारणा करण्यासाठी ते तहसील कार्यालय पंढरपूर येथील महसूल सहायक सुतार यांची भेट घेऊन विचारणा केली असता त्यांनी प्रत्येक प्रकरणासाठी 500/- रू द्या, मग अंतिम आदेशाचे काम करतो असे बोलून लाचेची मागणी करीत असल्याचे तक्रार सांगुन सविस्तर तक्रार स्वःहस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून धम्मरत्न राजकुमार कांबळे व पंच क्र.2 म्हणून शाक्यपुत्र उपगुप्त चौधरी यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP.MADE IN CHINA 1080938व्हॉईस रेकॉर्डर व NEXUS कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवरNEXUS MICRO 10SD HC 8GB त्याच्या मागील बाजूस NKS-XY1/26 CE MMCO8AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर तक्रारदार व पंचांना पडताळणीपुर्वी त्यांचे निवेदन घ्यायचे असून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येत असल्याचे सांगुन त्याकामी आणखीन एक HIKVISION कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर MICRO V10 SD HC 1 8GB HIKVISION त्याच्या मागील बाजूस YBW08S0122ZFHS2538008Gक्र असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केला. त्यानंतर तक्रारदार फावडे व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 16.51 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोना/30 नरोटे यांनी केले. त्यानंतर तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीकामी पुन्हा योग्य त्या सुचना देऊन 16.58 वा चे सुमारास रवाना केले.

तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे हे दोघे 17.22 वा चे सुमारास विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात परत आले, त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बोलावून घेऊन तक्रारदार यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीकरीता सुतार यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याची हकिकत पंच, पो.उपअधीक्षक चौगुले व आमच्या समक्ष कथन करण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार फावडे दोघे तहसील कार्यालयात जाऊन लोकसेवक सुतार यांची भेट घेतलो, त्यावेळी सुतार हे मिटींगकरीता प्रांत ऑफिसकडे जायच्या गडबडीत होते. त्यादरम्यान तक्रारदार फावडे यांनी जन्म-मृत्यू दाखले मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत व त्यांच्या आदेशाबाबत चर्चा सुरू केली. त्यावेळी तक्रारदार फावडे यांनी ती नाडीवाले अन ती म्हमाणे..म्हमाणेची ऑर्डर दिली ती लय नशिब त्यला लय गडबड होती..त्याज दिल्यामुळ ती लय खुष झाल माहिती हाय का..लोकाच एकएक वर्ष काढल ना..ती बनकरच किती वर्षाच हाय? तेजय सर्वगौड किती वर्षाच हाय? ती पण काढून द्या असे म्हणाले. त्यावर सुतार यांनी त्याज क्लियर होतय सगळ फक्त त्याला ती उतारा अन बोर्ड सर्टिफिकेट

आणून दे म्हणून सांग असे बोलतच हाताच्या इशा-याने पैश्याची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्याज कस करू द्या? म्हमाणेच अन ती असे विचारले असता, सुतार यांनी तुमच तुम्ही काय द्यायचय ती द्या.. तुम्ही द्या असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तुमच तुम्ही द्या पण किती मला सांगा आकडा असे विचारले असता, सुतार यांनी आता आपण हायच की, रेग्युलर घेतोयच की, तुम्ही जेवढ द्यायचय तेवढ द्या असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी रेग्युलर देतोय तेवढ मग किती? पाचशे देऊ का प्रत्येक ऑर्डरला.. बाकीच म्हमाणे अन ती ह्वाज म्हमाणे, बनकरची ती ऑर्डर काढा.. तुम्ही रेग्युलर प्रमाणे.. पाचशे प्रमाणे द्या म्हणताय तर पाचशे प्रमाणे देतो अं असे म्हणाले. त्यावर सुतार यांनी मी काय आता आकडा काढत नाय, तुमच तुम्ही काढा किती झालय काय बघा अं असे म्हणून त्यांच्या मिटींगकरीता प्रांत ऑफिसकडे निघून गेले. त्यानंतर आम्ही परत आलो अशी हकिकत सांगितली.

फिर्याद दि.01/06/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.29/05/2026 रोजी 12.30 वा चे सुमारास आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे, व्यवसाय - वकिली, रा. पंढरपूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. त्यानुसार 14.00 वा चे सुमारास 1) धम्मरत्न राजकुमार कांबळे, पद -कनिष्ठ श्रेणी लिपिक व 2) शाक्यपुत्र उपगुप्त चौधरी, पद - कनिष्ठ श्रेणी लिपिक हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हॉईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 14.30 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, पो.उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण आम्ही पंढरपूरच्या दिशेने रवाना झालो. यादरम्यान तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून आम्ही गोपाळपूर येथील

विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात 16.00 वा. जाऊन पोहोचलो. काहीवेळात तक्रारदार फावडे हे सुध्दा त्याठिकाणी पोहोचले. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून पो.उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंचांची, पथकातील अंमलदारांची व आमची स्वतःची ओळख करून दिलो. त्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव, पत्ता व त्यांच्या तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री.रोहित रामभाऊ फावडे, व्यवसाय - वकिली असे सांगुन ते दिवाणी, फौजदारी दाव्यांसह 01 वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये जन्म-मृत्यू दाखले न काढलेल्या प्रकरणात पक्षकारांच्यावतीने तहसीलदार यांच्या कोर्टात अर्ज दाखल करून जन्म-मृत्यू दाखला मिळण्याकरीता आवश्यक तहसीलदार यांचे आदेश प्राप्त करून देण्याचे काम करतात. त्यापैकी रमेश बनकर, सागर कांबळे, विकास पवार व इतर काही प्रकरणे अंतिम आदेशावर असून त्यांच्या आदेशाबाबत विचारणा करण्यासाठी ते तहसील कार्यालय पंढरपूर येथील महसूल सहायक सुतार यांची भेट घेऊन विचारणा केली असता त्यांनी प्रत्येक प्रकरणासाठी 500/- रू द्या, मग अंतिम आदेशाचे काम करतो असे बोलून लाचेची मागणी करीत असल्याचे तक्रार सांगुन सविस्तर तक्रार स्वःहस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार रोहित रामभाऊ फावडे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून धम्मरत्न राजकुमार कांबळे व पंच क्र.2 म्हणून शाक्यपुत्र उपगुप्त चौधरी यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार फावडे, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP.MADE IN CHINA 1080938व्हॉईस रेकॉर्डर व NEXUS कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवरNEXUS MICRO 10SD HC 8GB त्याच्या मागील बाजूस NKS-XY1/26 CE MMCO8AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर तक्रारदार व पंचांना पडताळणीपुर्वी त्यांचे निवेदन घ्यायचे असून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येत असल्याचे सांगुन त्याकामी आणखीन एक HIKVISION कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर MICRO V10 SD HC 1 8GB HIKVISION त्याच्या मागील बाजूस YBW08S0122ZFHS2538008Gक्र असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केला. त्यानंतर तक्रारदार फावडे व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 16.51 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोना/30 नरोटे यांनी केले. त्यानंतर तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीकामी पुन्हा योग्य त्या सुचना देऊन 16.58 वा चे सुमारास रवाना केले.

तक्रारदार फावडे व पंच क्र.1 कांबळे हे दोघे 17.22 वा चे सुमारास विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात परत आले, त्यावेळी आम्ही त्यांना शासकीय वाहनात बोलावून घेऊन तक्रारदार यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 कांबळे यांना पडताळणीकरीता सुतार यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याची हकिकत पंच,

पो.उपअधीक्षक चौगुले व आमच्या समक्ष कथन करण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार फावडे दोघे तहसील कार्यालयात जाऊन लोकसेवक सुतार यांची भेट घेतलो, त्यावेळी सुतार हे मिटींगकरीता प्रांत ऑफिसकडे जायच्या गडबडीत होते. त्यादरम्यान तक्रारदार फावडे यांनी जन्म-मृत्यू दाखले मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत व त्यांच्या आदेशाबाबत चर्चा सुरू केली. त्यावेळी तक्रारदार फावडे यांनी ती नाडीवाले अन ती म्हमाणे..म्हमाणेची ऑर्डर दिली ती लय नशिब त्यला लय गडबड होती..त्याज दिल्यामुळ ती लय खुष झाल माहिती हाय का..लोकाच एकएक वर्ष काढल ना..ती बनकरच किती वर्षाच हाय? तेजय सर्वगौड किती वर्षाच हाय? ती पण काढून द्या असे म्हणाले. त्यावर सुतार यांनी त्याज क्लियर होतय सगळ फक्त त्याला ती उतारा अन बोर्ड सर्टिफिकेट आणून दे म्हणून सांग असे बोलतच हाताच्या इशा-याने पैश्याची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्याज कस करू द्या? म्हमाणेच अन ती असे विचारले असता, सुतार यांनी तुमच तुम्ही काय द्यायचय ती द्या.. तुम्ही द्या असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तुमच तुम्ही द्या पण किती मला सांगा आकडा असे विचारले असता, सुतार यांनी आता आपण हायच की, रेग्युलर घेतोयच की, तुम्ही जेवढ द्यायचय तेवढ द्या असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी रेग्युलर देतोय तेवढ मग किती? पाचशे देऊ का प्रत्येक ऑर्डरला.. बाकीच म्हमाणे अन ती ह्राज म्हमाणे, बनकरची ती ऑर्डर काढा.. तुम्ही रेग्युलर प्रमाणे.. पाचशे प्रमाणे द्या म्हणताय तर पाचशे प्रमाणे देतो अं असे म्हणाले. त्यावर सुतार यांनी मी काय आता आकडा काढत नाय, तुमच तुम्ही काढा किती झालय काय बघा अं असे म्हणून त्यांच्या मिटींगकरीता प्रांत ऑफिसकडे निघून गेले. त्यानंतर आम्ही परत आलो अशी हकिकत सांगितली.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** DASHRATH BHANUDAS WAGHMODE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DASHRATH BHANUDAS WAGHMODE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1997 | | | | चेचक: होय |
| 2 | पुरुष | 1976 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**